॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

सिद्ध म्हणे नामकरणी। गुरुभक्तशिखामणि।

तुझी भक्ति गुरुचरणीं। लीन जाहली निर्धारीं॥ १ ॥

गद्यरुप :-

मी श्रीगणेशाला नमस्कार करतो. मी श्रीसरस्वतीला नमस्कार करतो. श्रीगुरुंना नमस्कार करतो. सिद्ध मुनि म्हणाले, "गुरुभक्तीतील उत्कृष्ट रत्न असलेल्या नामकरणी तुझी भक्ति गुरुचरणी लीन झालेली आहे, हे निश्चित आहे."

शब्दार्थ :-

शिखामणि= उत्कृष्ट रत्न	निर्धारणे=निश्चित करणे	चरण =पाय

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २

पर्जन्य येतां पुढारां। जैसे येतो सूचना वारा।
तैसें तुझें दैन्य -हरा। ऐकसी गुरुचरित्र कथनभेद॥ २॥

गद्यरुप :-

“पाऊस येण्याच्या पुढे (आधी) जसा वारा सूचना देतो, तशी (मी तुला) आधीच गुप्त बातमी देतो, तू गुरुचरित्र कथन ऐकल्याने तुझे दैन्य हरण होणार आहे.”

शब्दार्थ :-

पुढारा= पुढे	हरणे= निवारणे	भेद= गुप्त बातमी

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३

ऐसें चरित्र कामधेनु। सांगेन तुज विस्तारोन।

एकचित्त करूनि मन। ऐक शिष्या नामधारका॥ ३ ॥

गद्यरुप :-

“असे हे चरित्र कामधेनुप्रमाणे आहे. मी तुला ते विस्ताराने सांगेन. नामधारक शिष्या, तू ते मन एकचित्त करुन ऐक.”

शब्दार्थ :-

कामधेनु= इच्छित वस्तू देणारी गाय

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४

कृष्णावेणीतटाकेसी। भुवनेश्वरी -पश्चिमेसीं।
औदुंबर वृक्षेसीं। राहिले श्रीगुरु परियेसा॥४॥

गद्यरुप :-

कृष्णानदीतीराच्या पश्चिम दिशेला भुवनेश्वरी देवी मंदिर आहे. (कृष्णानदी तीरावरील) औदुंबर वृक्षाखाली श्रीगुरु राहिले, हे ऐक.

शब्दार्थ :-

तटाक=तीर	परियसणे= ऐकणे
कृष्णावेणी= कृष्णा नदीचे नाव	

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५

गौप्यरूप असती गुरु। ठाव असे अगोचरु।
अनुष्ठान धुरंधरु। चतुर्मास येणेंपरी॥५॥

गद्यरुप :-

गुरु गुप्त रुपात तेथे रहात होते. त्यांचा पत्ता अज्ञात असे. (ते रहात असलेले ठिकाण कोणालाही माहित नव्हते). विधीवत धर्मकृत्त्यांचे प्रवर्तक (म्होरक्या) असलेले (श्रीगुरु) अशाप्रकारे चार महिने तेथे रहात होते. {अनुष्ठान करणारी व्यक्ती ४ महिने गुप्त (भूमिगत) अवस्थेत रहाणे ही अवघड गोष्ट आहे.}

शब्दार्थ :-

गौप्य = गुप्त गोष्ट	ठाव= पत्ता
अगोचर= अज्ञात	अनुष्ठान =विधीपूर्वक धर्मकृत्य
धुरंधर= म्होरक्या	चतुर्मास =चतुः चार मास महिना ४ महिने

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ६

सिद्धस्थान असे गहन। भुवनेश्वरीसंनिधान।
विशेष श्रीगुरु राहिले म्हणोन। उत्कृष्ट जाहलें महिमान॥ ६ ॥

गद्यरुप :-

भुवनेश्वरीच्या सान्निध्यातील श्रीगुरुंच्या वास्तव्यामुळे स्थापित झालेले स्थान, समजण्यास अत्यंत कठीण आहे. श्रीगुरु तेथे राहिले म्हणून, त्या स्थानाची थोरवी विशेष (अधिक) उत्कृष्ठ झाली.

शब्दार्थ :-

सिद्ध=स्थापित	गहन= दुर्ज्ञेय= समजण्यास कठीण
संनिधान= सान्निध्य जवळ	महिमान थोरवी

भावार्थ:-भिल्लवडी येथे श्रीगुरु भूमीगत अवस्थेत रहात होते, एवढाच इतिहास ज्ञात असावा. श्रीगुरु वास्तव्यास असलेल्या , भिल्लवडी येथील ठिकाणाचा पत्ता समजू शकत नाही.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ७

ऐकोनि सिद्धाचें वचन। नामधारक करी नमन।
परमात्मा श्रीगुरुराणा। कां रहावें गौप्यरुपें॥७॥

गद्यरुप :-

सिद्धमुनिचे बोलणे ऐकून नामधारक (शिष्याने) नमस्कार करीत विचारले,"(स्वतः) परमात्मा (असलेला) श्रीगुरुराणा (श्रीनृसिंहसरस्वती) गुप्तरुपाने त्याठिकाणी का राहिला ? "

शब्दार्थ :-

वचन= बोलणे	नमन= नमस्कार	गौप्य= गुप्त गोष्ट

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ८

त्यासी काय असे तपस। भिक्षा मागणें काय हर्ष।
संदेह माझ्या मानसास। निवारावा दातारा ॥८॥

गद्यरुप :-

"त्याला श्रीगुरुंना गुप्त अवस्थेत राहून असे काय काम करायचे होते? भिक्षा मागण्यात अत्यानंद काय आहे? माझ्या मनात संदेह (शंका) आहे. हे दातारा (सिद्धमुनि), तुम्ही त्याचे निवारण करावे."

शब्दार्थ :-

तपस् (संस्कृत)= कर्म =काम	हर्ष= अतिशय आनंद	मानस=मन

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ९

ऐक वत्सा नामधारका। भिक्षा मागतो पिनाका।

आणिक सांगेन ऐका। दत्तात्रेय तैसाची॥ ९॥

गद्यरुप :-

(सिद्धमुनि म्हणाले,) "हे वत्सा (शिष्य) नामधारका ऐक. शंकर भिक्षा मागतो. आणखीन (मी) सांगतो ते ऐका. दत्तात्रेय सुद्धा तसाच आहे."

शब्दार्थ :-

पिनाक= शंकर	आणिक (प्राकृत)= आणखी

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १०

दत्तात्रेय त्रयमूर्ती। भिक्षुकरूपी असे दिसती।
भक्तजनानुग्रहार्थी। तीर्थयात्रे हिंडतसे॥ १०॥

गद्यरुप :-

तीनमूर्ति असलेले दत्तात्रेय, भिक्षुकरुपात दिसतात.
भक्तजनांवर कृपा करण्यासाठी, तीर्थयात्रा करीत (दत्तात्रेय) हिंडत असत.

शब्दार्थ :-

त्रयमूर्ती= तीनमूर्ति= ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या रज- सत्त्व- तम गुणांचे एकत्रित रुप असलेली एक विष्णु मूर्ति
भक्तजनानुग्रहार्थी=भक्तजन +अनुग्रह(कृपा) +अर्थ (हेतू)

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ११

अनुपम तीर्थें भूमिवरी। असती गौप्य अपरांपारीं।
श्री गुरुमूर्ति प्रीतिकरीं।प्रगटले भक्तांलागी॥ ११ ॥

गद्यरुप :-

वाताहत झाल्याने भूमीवरील अद्वितीय तीर्थें गुप्त रुपात आहेत. प्रेम करणारे (प्रेमळ) श्रीगुरुमूर्ति भक्तांसाठी भूमीवर, प्रगट झालेले आहेत.

शब्दार्थ :-

अनुपम= अद्वितीय	गौप्य=गुप्त गोष्ट	अपरांपारी (प्राकृत) = वाताहत
प्रीतिकर=प्रीति (प्रेम) +कर (करणे)		लागी=साठी

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १२

भक्तजनोपकारार्थ। तीर्थें हिंडे श्रीगुरुनाथ।
गौप्य व्हावया कारणार्थ। समस्त येऊनि मागती वर॥ १२॥

गद्यरुप :-

भक्तजनांवर उपकार करण्यासाठी श्रीगुरुनाथ तीर्थक्षेत्रे हिंडत असत. सर्व (लोक) येऊन वर मागतील, ह्या कारणासाठी श्रीगुरुनाथ (श्रीनृसिंहसरस्वती) गुप्त रुपात (भूमीगत अवस्थेत) रहात होते.

शब्दार्थ :-

भक्तजनोपकारार्थ=भक्त +जन (लोक) + उपकार +अर्थ (हेतू)		
गौप्य= गुप्त गोष्ट	कारणार्थ=कारण + अर्थ (हेतू)	समस्त= सर्व

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १३

लपवितां दिनकरासी। केवी लपे तेजोराशी।
कस्तूरी ठेवितां जतनेसी। वास केवीं गौप्य होय॥ १३ ॥

गद्यरुप :-

सूर्याला लपविला तर त्याच्या सूर्यकिरणांचे ढिग कशाप्रकारे लपतील? कस्तुरीचे जतन केले (कस्तुरी काळजीपूर्वक जपून ठेवली) तरी त्याचा वास गुप्त कसा करणार ?

शब्दार्थ :-

दिनकर= सूर्य	केवी= कोणत्या प्रकारे ?	तेज= सूर्यकिरण	राशी= ढीग
जतन=काळजीपूर्वक संगोपन	केवी= कसे	गौप्य= गुप्त गोष्ट	

भावार्थ :- सूर्याची किरणे लपणार नाहीत, ती आजूबाजूने दिसतील.

तशाचप्रकारे जतन केलेल्या कस्तुरीचा वास येणार.

ओवी क्रमांक १४

आणिक सांगेन तुज साक्षी। गुण कैसा कल्पवृक्षीं।
जेथें राहे तया क्षितीकांक्षी। कल्पिलें फळ तेथें होय॥ १४॥

गद्यरुप :-

तुला आणखीन पुरावा सांगतो, चिंतेच्या वृक्षाचा गुण कसा असतो? तो संशय, शंका असलेल्या ठिकाणी वास करतो. मनुष्य मनात जशी इच्छा करतो, तसे त्याला चिंतेच्या वृक्षाचे फळ मिळते.

शब्दार्थ :-

साक्षी = पुरावा	कल्प = शंका
कांक्षा= शंका, संशय, इच्छा	क्षिती= चिंता
कल्पिणे = कल्पना करणे	कल्पना= विचार

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १५

याकारणें तया स्थानीं। प्रगटले गुरुमुनि।

सांगेन तुज विस्तारूनि। एकचित्तें परियेसा॥ १५॥

गद्यरुप :-

या कारणासाठी गुरुमुनि (श्रीनृसिंह सरस्वती) त्याठिकाणी प्रगट झाले. मी तुला ते कारण विस्तारून सांगेन, ते तू एकचित्ताने ऐक.

शब्दार्थ :-

स्थान= ठिकाण	परियसणे= ऐकणे

जिज्ञासुंनी कल्पवृक्ष ह्या कारणाचे स्पष्टीकरण आशय १७ मध्ये पहावे, ही विनंति.

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १६

करवीरक्षेत्र नगरांत। ब्राह्मण एक वेदरत।
शास्त्रपुराण विख्यात। सांगे सकळ विद्वज्जनां॥ १६ ॥

गद्यरुप :-

वेदांमध्ये रममाण होणारा एक ब्राह्मण करवीरक्षेत्र नगरीत रहात होता .तो सर्व विद्वान लोकांना प्रसिद्ध असलेली शास्त्र पुराणे सांगत असे.

शब्दार्थ :-

करवीर= कोल्हापूर	रत=रममाण	विख्यात= प्रसिद्ध
सकळ= सर्व	विद्वज्जन =विद्वत् + जन(लोक)	

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १७

अग्रवेदी असे आपण।जाणे तर्क व्याकरण।

आन्हिकप्रमाण आचरण। कर्ममार्गी रत होता॥ १७॥

गद्यरुप :-

तो ब्राह्मण स्वतः ऋग्वेदी असून तर्क व्याकरण जाणत होता. नित्यकृत्य परिमाणांनुसार आचरण करीत, तो ब्राह्मण कर्ममार्गात रममाण होत असे.

शब्दार्थ :-

अग्र (संस्कृत) पहिला + वेद= पहिला वेद= ऋग्वेद	
आन्हिक= नित्यकृत्य	प्रमाण= परिमाण
कर्म=काम उद्योगधंदा	रत= रममाण

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १८

त्यासी जाहला एकसुत। मूर्ख असे उपजत।

दैववशें मातापिता मृत। असमाधान होऊनियां॥ १८॥

गद्यरुप :-

त्याला एक मुलगा झाला, तो जन्मतः मूर्ख होता. (त्या मुलाचे) आई- वडिल असमाधानी होऊन, त्यांच्या प्रारब्धानुसार वारले.

शब्दार्थ :-

सुत= मुलगा	उपजत= जन्मतः
दैववशात= प्रारब्धयोगेकरुन (प्रारब्ध=नशीब)	मृत= मेलेला

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक १९

वर्धतां मातापित्याघरीं बाळ। वर्षे सात जाहली केवळ।
व्रताबंध करिती निश्चळ। तया द्विजकुमरकासी॥ १९॥

गद्यरुप :-

मातेच्या पित्याघरी (आजोळी) ते बाळ वाढत असताना, फक्त ७ वर्षे झाली. वर्तनावर नसलेली बंधने (व्रताबंध= व्रत + अबंध) त्या ब्राह्मणकुमाराला स्थिर करीत होती (त्या ब्राह्मण मुलाची प्रगती कुंठीत होत होती).

शब्दार्थ :-

वर्धणे= वाढणे	केवळ= फक्त	व्रत=वर्तन
मातेच्या(आईच्या) पित्याघरी (वडिलांच्या घरी) = आजोळी		
निश्चळ= स्थिर	द्विजकुमर=द्विज(ब्राह्मण)कुमर (बाळ)	

भावार्थ :- व्रतबंध (मुंज) करण्यामागचा मुख्य हेतू ,श्रीगुरुचरित्रकारांनी ह्या ओवीत सांगितलेला दिसतो.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २०

न ये स्नानसंध्या त्यासी। गायत्रीमंत्र परियेसीं।
वेद कैंचा मूर्खासी। पशूसमान जहाला असे॥ २०॥

गद्यरुप :-

त्याला स्नानसंध्या करता येत नव्हती. त्याने गायत्रीमंत्र ऐकलेला होता. त्या मूर्खाला वेद कोठून (कसा) येणार? तो पशूसारखा झालेला होता.

शब्दार्थ :-

संध्या= ब्राह्मणांनी त्रिकाळ करण्याची उपासना		
परियसणे= ऐकणे	कैंचा= कोणता ? कोठील ?	समान= सारखा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २१

जेथें सांगती अध्ययन। जाऊनि आपण शिकूं म्हणे।
तावन्मात्र शिकतांचि क्षण। सर्वेचि विस्मृति होय त्यासी॥ २१ ॥

गद्यरुप :-

जेथे अध्ययन करायला सांगतील, तेथे जाऊन आपण शिकू, असे तो म्हणत असे. त्याला शिकलेल्या तितक्या ज्ञानाचे (शिकलेले सर्व ज्ञानाचे) क्षणांत तत्काळ विस्मरण होत असे.

शब्दार्थ :-

अध्ययन =शिकणे	तावन्मात्र= तितकेच
सवे= तत्काळ	विस्मृति= विस्मरण

भावार्थ :-कथानायकास (ब्राह्मण मुलास) अल्प स्मरणशक्तीचा (Short Memory) आजार असावा.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २२

त्या ग्रामींचे विद्वज्जन। निंदा करिती सकळै जन।
विप्रकुळीं जन्मून। ऐसा मूर्ख उपजलासी॥ २२ ॥

गद्यरुप :-

त्या गावातील विद्वान लोक तसेच सगळे लोक त्याची निंदा करीत असत, “ब्राह्मणकुळात जन्मून हा असा मूर्ख निपजला.”

शब्दार्थ :-

विद्वज्जन= विद्वत् (विद्वान) + जन (लोक)	निंदा =निर्भर्त्सना= उपहास
सकळ= सगळे	विप्र=ब्राह्मण

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २३

तुझा पिता ज्ञानवंत। वेदशास्त्रादि अभिज्ञात।
त्याचे पोटीं कैसा केत। उपजलासी दगडापरी॥२३॥

गद्यरुप :-

"तुझा ज्ञानी पिता वेदशास्त्र इत्यादिंचा माहितगार (जाणकार) होता. त्याच्यापोटी दगडासारख्या बुद्धिचा कसा जन्माला आलास?

शब्दार्थ :-

वेदशास्त्रादि=वेदशास्त्र+ आदि (इत्यादि)	अभिज्ञात (संस्कृत)= माहितगार
केतः (संस्कृत)= बुद्धि	उपजणे =जन्मणे

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २४

जळो जळो तुझें जिणें। पित्याच्या नामा आणिलें उणें।
पोटीं बांधूनि पाषाण ।तळें विहिरी कां न करिसी॥ २४॥

गद्यरुप :-

तुझे जीवन जळू दे (तुझ्या जीवनाचे दहन होउ दे). तू पित्याच्या (तुझ्या वडिलांच्या) नावाला कमीपणा आणलेला आहेस. पोटाला दगड बांधून विहिरीचा तळ (जवळ) का करीत नाहीस ? (पोटाला दगड बांधून विहीरीत बुडून का मरत नाहीस ?)

शब्दार्थ :-

जळणे =दहन (अग्निसंस्कार, जाळणे) होणे	उणे= कमीपणा
पाषाण= दगड	तळ = खालचा भाग

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २५

जन्मोनियां संसारी। वृथा जाहलासी सूकरापरी।
तुज गति यमपुरीं। अनाचारें वर्तसी॥ २५॥

गद्यरुप :-

ह्या संसारात जन्माला येऊन तू (तुझा जन्म) डुक्करासारखा वाया गेलास. तू अनाचाराचे वर्तन करतोस, तू यमाच्या नगरांत (नरकात) जाशील.

शब्दार्थ :-

वृथा= वाया	सूकर= डुक्कर
गति= गमन =जाणे	यमपुरी= यम +पुरी (नगर)= नरक

ओवी क्रमांक २६

ज्यासी विद्या असे ऐका। तोचि मनुष्यांमध्ये अधिका।
जेवीं द्रव्य असे निक्षेपिका। तैसी विद्या परियेसा॥२६॥

गद्यरुप :-

ज्याच्या जवळ विद्या आहे अशी व्यक्ती मनुष्यांमध्ये श्रेष्ठ असते, असे आपण ऐकतो. ज्याप्रमाणे द्रव्य नीट ठेवतो, तशीच विद्या स्वतःकडे जपून ठेवायची असते हे ऐक

शब्दार्थ :-

अधिक= श्रेष्ठ	जेवी= ज्याप्रमाणे
निक्षेपणे = ठेवणे	परियसणे= ऐकणे

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २७

ज्याचे हृदयीं असे विद्या। त्यासी अखिल भोग सदा।
यशस्वी होय सुखसंपदा। समस्तांमध्यें पूज्य तोचि॥२७॥

गद्यरुप :-

ज्याच्याकडे (अंतःकरणांत) विद्या आहे, त्याला सदैव सर्व भोग भोगायला मिळतात. तो (आयुष्यात) यशस्वी होऊन त्याला सुख संपदा (संपत्ति) प्राप्त झाल्याने सर्व लोकांमध्ये तो पूज्य होतो.

शब्दार्थ :-

हृदय= अंतःकरण, मन	सदा= सदैव
अखिल= सर्व	समस्त= सर्व

ओवी क्रमांक २८

श्रेष्ठ असे वयें थोर। विद्याहीन अपूज्य नर।
अश्रेष्ठ असे एखादा नर। विद्या असतां पूज्यमान॥२८॥

गद्यरुप :-

वयाने मोठा असलेला श्रेष्ठ नर विद्याहीन असेल तर अपूज्य होतो. (लोकांना तो पूजनीय वाटत नाही, लोक त्याला मान देत नाहीत).

श्रेष्ठ नसलेल्या कनिष्ठ नराकडे विद्या असेल तर तो पूज्यनीय होतो. (लोक त्या माणसाला मान देतात)

शब्दार्थ :-

थोर= मोठा	नर= मनुष्य

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक २९

ज्यासी नाहीं सहोदर। त्यासी विद्या बंधु-भ्रातर।
सकळिकां वंद्य होय नर। विद्या असे ऐशागुणें॥ २९ ॥

गद्यरुप :-

ज्याला सख्वा भाऊ नाही, त्याला विद्या हीच भाऊ बंद असते. विद्येच्या ह्या अशा गुणामुळे विद्या असलेला मनुष्य सगळ्यांना वंदनीय होतो.

शब्दार्थ :-

सहोदर =सख्वा भाऊ	बंधु = भाऊ
भ्राता = भाऊ	सकळ=सगळे

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३०

एखादे समयीं विदेशासी। जाय नर विद्याभ्यासी।
समस्त पूजा करिती त्यासी। विदेश होय स्वदेश॥३०॥

गद्यरुप :-

एखाद्यावेळी विद्येचा व्यासंगी मनुष्य परदेशी जातो. तेथे सर्व लोक त्याची पूजा करतात (त्याला मानतात). पुढे विदेश हाच त्याचा स्वदेश होतो.

शब्दार्थ :-

समय= वेळ	विदेश= परदेश
नर= मनुष्य	विद्याभ्यासी=विद्या+अभ्यासी (व्यासंगी)

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३१

ज्यासी विद्या असे बहुत। तोचि होय ज्ञानवंत।
त्याचे देहीं देवत्व। पूजा घेई सकळांपाशी॥ ३१ ॥

गद्यरुप :-

ज्याला खूप विद्या प्राप्त झालेली असते, तोच ज्ञानी असतो. त्याचे देवत्व धारण करणारे शरीर सगळ्यांकडून स्वतःची पूजा करवून घेत असते.

शब्दार्थ :-

बहुत= खूप	देही= शरीर धारण करणारा	सकळ=सर्व

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३२

एखाद्या राज्याधिपतीसी। समस्त वंदिती परियेसीं।
ऐसा राजा आपण हर्षीं। विद्यावंतासी पूजा करी॥३२॥

गद्यरुप :-

एखाद्या राज्याच्या राजाला सर्व जण वंदन करतात, असे आपण ऐकतो. असा राजा अत्यंत आनंदाने विद्यावंताची (विद्वानाची) पूजा करतो.

शब्दार्थ :-

परियसणे= ऐकणे	विद्यावंत= विद्वान

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३३

ज्याचें पदरीं नाहीं धन। त्याचें विद्याच धन जाण।
विद्या शिकावी याचिकारण। नेणता होय पशूसमान॥ ३३ ॥

गद्यरुप :-

ज्याच्याजवळ धन नाही त्याचे विद्या हेच त्याचे धन असते, हे जाण. याचकारणास्तव विद्या शिकावी. अज्ञानी (ज्ञान नसलेला) पशूसारखा असतो.

शब्दार्थ :-

पदर= स्वतःचा संग्रह	नेणता= अज्ञान	समान=सारखा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३४

ऐकोनि ब्राह्मणांचें वचन। ब्रह्मचारी करी नमन।

स्वामीनीं निरोपिलें ज्ञान। विद्याभ्यास करावया॥ ३४॥

गद्यरुप :-

ब्राह्मणांचे बोलणे ऐकून, त्या ब्रह्मचारी मुलाने नमस्कार केला. “स्वामींनी (आपण ब्राह्मण लोकांनी), मला विद्येचा अभ्यास करण्यासाठी ज्ञान देणारा संदेश दिलात.” (असे तो ब्राह्मण मुलगा म्हणाला.)

शब्दार्थ :-

वचन= बोलणे	निरोप= संदेश

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३५

जन्मांतरीं पूर्वी आपण। केलें नाहीं विद्यादान।
न ये विद्या याचि कारण। त्यासी काय करणें म्हणतसे॥ ३५॥

गद्यरुप :-

"पूर्वी होऊन गेलेल्या अन्य जन्मांमध्ये आपण विद्यादान केले नाही, याच कारणामुळे आपल्याला विद्या येत नाही. त्यासाठी काय करावे?" असे तो (ब्राह्मण मुलगा) म्हणत होता.

शब्दार्थ :-

जन्मांतरी=	दुसरा (अन्य) जन्म

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३६

ऐसा आपण दोषी।उद्धरावें कृपेसीं।
जरी असेल उपाय यासी। निरोपावें दातारा॥३६॥

गद्यरुप :-

“अशाप्रकारे मीच दोषी आहे. आपल्या कृपेने मला उद्धरावे. यावर जर उपाय असेल, तर हे दातारा, त्या उपायाचा संदेश मला द्यावा”.

शब्दार्थ :-

उद्धरणे= वर काढणे	निरोप= संदेश	दातारा= दाता= देणारा, उदार, दानशील

ओवी क्रमांक ३७

परिहासकें ते ब्राह्मण। सांगताति हांसोन।

होईल पुढें तुज जनन। तधीं येईल तुज विद्या॥३७॥

गद्यरुप :-

थट्टेने हसत ते ब्राह्मण सांगत होते, “तुझा पुढे जन्म होईल, तेव्हा तुला विद्या येईल. (पुढच्या जन्मांत तुला विद्या येईल.)”

शब्दार्थ :-

परिहास (संस्कृत) =थट्टा	जनन= जन्म	तधी= तेव्हा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३८

तुज कैंचा विद्याभ्यासु। नर नव्हेसि तूं साच पशु।
भिक्षा मागूनि उदर पोस । अरे मूर्खा कुळनाशका॥३८॥

गद्यरुप :-

“तुला कोणत्या विद्येचा अभ्यास येणार ? तू मनुष्य नसून खरा खुरा जनावर आहेस. अरे मूर्खा, कूळाचा नाश करणाऱ्या, भिक्षा मागून स्वतःचे पोट पोस (भर).

शब्दार्थ :-

कैंचा =कोणता	विद्याभ्यासु= विद्या + अभ्यासु	साच= खरे
नर= मनुष्य	पशु= जनावर	उदर= पोट

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ३९

ऐसें नानापरी नीचोत्तरेसीं। बोलती द्विज लोक त्यासी।
वैराग्य धरूनि मानसीं। निघाला बाळ अरण्यासी॥ ३९॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे त्याला कमी लेखत ब्राह्मण लोक उत्तर देत होते. मनाने उदासीन झालेला बाळ अरण्याकडे निघाला.

शब्दार्थ :-

नीचोत्तर= नीच (खाली) + उत्तर (जबाब, प्रति वचन)		
द्विज=ब्राह्मण	वैराग्य= विरक्त (उदासीन) पणा	मानस= मन

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४०

मनीं झाला खेदे खिन्न। म्हणे त्यजीन आपुला प्राण।
समस्त करिती दूषण। काय उपयोग जीवूनियां॥४०॥

गद्यरुप :-

मनांत खेदाने खिन्न झालेला तो मुलगा म्हणाला, "मी प्राण त्याग करीन. सर्व लोक मला दूषण देतात. (मी) जगून काय उपयोग ?"

शब्दार्थ :-

त्यजणे= सोडणे	समस्त= सर्व

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४१

जळो जळो आपुलें जिणें। पशु झालों विद्याहीन।
आतां वांचोनि काय कारण। म्हणोनि निघाला वैराग्यें॥ ४१ ॥

गद्यरुप :-

‘माझे जीवन जळून जाऊ दे. विद्येशिवाय (विद्या प्राप्त न झाल्याने), मी पशू झालेलो आहे. आता जगून काय उपयोग ?’ असे म्हणून वैराग्य - विचाराने तो (अल्प स्मरणशक्ती असलेला मुलगा) निघाला.

शब्दार्थ :-

जळणे= दहन होणे= अग्निसंस्कार, जाळणे	जिणे= जीवन, जन्म
विद्याहीन =विद्याविरहित	वाचणे= जगणे

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४२

भिल्लवडीग्रामासी। आला ब्रह्मचारी परियेसीं।
अन्नोदक नेघे उपवासी। पातला निशीं दैववशें॥४२॥

गद्यरुप :-

ब्रह्मचारी भिल्लवाडी गावाशी आला असे ऐकलेले आहे. अन्न पाणी न घेतल्याने, उपवास घडलेला ब्रह्मचारी (भिल्लवाडी गावाला) नशिबाने रात्री पोहोचला.

शब्दार्थ :-

परियसणे= ऐकणे	अन्नोदक =अन्न + उदक (पाणी)
नेघणे (प्राकृत)= न घेणे	पातणे (प्राकृत)= येऊन पोचणे
निशी= रात्र	दैववशात= प्रारब्ध (नशीब) योगेकरुन

भावार्थ सिद्धमुनि श्रीगुरुंबरोबर भिल्लवाडीस न गेल्याने सिद्धमुनी भिल्लवाडीतील गोष्ट ऐकिव बातमींवर आधारीत सांगत असावेत. रात्र झाल्याने तो मुलगा भिल्लवाडीस थांबला. तो मुलगा नशिबाने भिल्लवाडीस पोहोचला, असे श्रीगुरुचरित्रकार म्हणत असावेत

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४३

जेथें असे जगन्माता। भुवनेश्वरी विख्याता।
तेथे पातला त्वरिता। करी दर्शन तये वेळीं॥४३॥

गद्यरुप :-

ज्या ठिकाणी जगाची माता प्रसिद्ध भुवनेश्वरी आहे, त्या ठिकाणी भुवनेश्वरीदेवीच्या मंदिरात तो ब्रह्मचारी मुलगा येऊन पोहोचला. त्यावेळी तेथे पोहोचल्यावर लगेच भुवनेश्वरी देवीचे दर्शन घेतले.

शब्दार्थ :-

जगन्माता =जगत् + माता = जगाची माता	विख्यात= प्रसिद्ध
त्वरित= लगेच	पातणे (प्राकृत)= येऊन पोचणे

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४४

न करी स्नान संध्या देखा। अपार करीतसे दुःखा।
देवद्वारासन्मुखा। धरणे घेतलें तया वेळीं॥ ४४॥

गद्यरुप :-

स्नान संध्या न करता, खूप दुःख करताना दिसत होता. त्यावेळी देवदारासमोर (मंदिरासमोर) थांबण्याचे त्याने स्मरणात ठेवले.

शब्दार्थ :-

संध्या =ब्राह्मणांनी त्रिकाळ करण्याची उपासना		
द्वार दार	सन्मुख= समोर	धरणे = थांबणे

भावार्थ :- अल्प स्मरणशक्तीच्या विकाराने त्रस्त असलेल्या कथानायकाला मंदिराच्या दारात स्वतःला बसायचे आहे, ही गोष्ट मनावर बिंबविणे अवघड आहे.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४५

येणेंपरी दिवस तीनी। निर्वाण मन करूनि।
अन्नोदक त्यजूनि। बैसला तो द्विजकुमार॥४५॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे तीन दिवस कठोर मन करुन अन्नपाण्याचा त्याग करुन तो ब्राह्मणकुमार(भुवनेश्वरीदेवी मंदिरासमोर) बसला.

शब्दार्थ :-

निर्वाण= कठोर	अन्नोदक =अन्न +उदक (पाणी)
त्यजणे= त्याग करणे	द्विज=ब्राह्मण

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४६

नव्हे काहीं स्वप्न त्यालागोनि। म्हणोनि कोपे बहु मनीं।
म्हणे अंबा भवानी। कां उपेक्षिसी आम्हांसी॥ ४६ ॥

गद्यरुप :-

त्यासाठी त्याला त्याचे स्वप्न काही दिसत नव्हते. म्हणून तो मनांत खूप रागावला. तो स्वतःशी म्हणायला लागला,"अंबाभवानी आमची उपेक्षा का करत आहे ?"

शब्दार्थ :-

स्वप्न= मनाच्या जाणिवेची एक स्थिती

भावार्थ:-त्याला मनापासून वाटत होते की, भुवनेश्वरी देवी आपल्यावर प्रसन्न होणार !

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४७

आक्रोशोनि तये वेळीं। शस्त्रें घेऊनियां प्रबळी।
आपुली जिव्हा तात्काळी। छेदूनि वाहे देवीचरणीं॥४७॥

गद्यरुप :-

त्यावेळी त्याने आक्रोश करीत, हातात धारदार शस्त्र घेऊन, तत्काळ (स्वतःची) जीभ कापून देवीच्या पायाशी अर्पण केली.

शब्दार्थ :-

प्रबळ= फार शक्तिमान (धारदार)	जिव्हा= जीभ
छेदणे= तोडणे	चरण=पाय
वाहणे= अर्पण करणे	

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४८

जिव्हा वाहोनि अंबेसी। मागुती म्हणे परियेसीं।
जरी तूं मज उपेक्षिसी। वाहीन शिर तुझे चरणीं॥४८॥

गद्यरुप :-

आईला (देवी भुवनेश्वरीला) जीभ वाहून तो पुन्हा म्हणाला असे ऐकलेले आहे, "जर तू माझी उपेक्षा करशील तर मी मस्तक छाटून तुझ्या पायांवर अर्पण करीन."

शब्दार्थ :-

जिव्हा= जीभ	अंबा =देवी, आई
छेदणे= तोडणे	चरण=पाय
वाहणे= अर्पण करणे	शिर= मस्तक

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ४९

ऐसें निर्वाण मानसीं। क्रमिता झाला तो निशी।
स्वप्न जाहलें तयासी। ऐका समस्त श्रोते जन॥४९॥

गद्यरुप :-

अशी मनाशी प्रतिज्ञा करुन, तो रात्रीच्या अधीन झाला (झोपी गेला). त्याला प्रखरपणे (स्पष्टपणे) दिसलेले स्वप्न, सर्व श्रोते लोकहो ऐका.

शब्दार्थ :-

निर्वाण= प्रतिज्ञा	मानस = मन
क्रमणे= जाणे, गमन	निशी= रात्र
जाहली (हिंदी)= प्रखरपणा	समस्त= सर्व

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५०

"ऐक बाळा ब्रह्मचारी। नको आक्रोशूं आम्हांवरी।
असे कृष्णा- पश्चिमतीरीं। त्वरित जाय तयाजवळी ॥५०॥

गद्यरुप :-

"हे ब्रह्मचारी बाळा, तू आमच्यावर ओरडू (रागावू) नकोस. कृष्णा नदीचा पश्चिम तीर आहे, त्या ठिकाणाजवळ तू लगेच जा.

शब्दार्थ :-

आक्रोशः (संस्कृत)= ओरडणे	त्वरित= लगेच

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५१

औदुंबरवृक्षातळीं। असे तापसी महाबळी।
अवतारपुरुष चंद्रमौळी। तुझी वांछा पुरवील" ॥ ५१ ॥

गद्यरुप :-

औदुंबर वृक्षाखाली असलेला महा बलवान तपस्वी शंकराचा मनुष्य रुपातील अवतार आहे. तो तुझी इच्छा पूर्ण करील."

शब्दार्थ :-

तळ= खालचा भाग जमीन	तापसी= तपस्वी	बळी=बलवान पुरुष
चंद्रमौळी=शंकर	वांछा (संस्कृत) = इच्छा	
अवतार= देवादिकांचे अन्यरुपाने पृथ्वीवर येणे		

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५२

ऐसें स्वप्न तयासी। जाहलें अभिनव परियेसीं।
जागृत होतांचि हर्षीं। निघाला त्वरित तेथोनि॥५२॥

गद्यरुप :-

अपूर्व स्वप्न त्याला पडले, असे ऐकिवात आहे. स्वप्नातून जागा होताच तो ब्राह्मणकुमार अतिशय आनंदाने तेथून लगेच निघाला.

शब्दार्थ :-

अभिनव= अपूर्व	परियसणे= ऐकणे
जागृत = जागा	हर्ष= अतिशय आनंद
त्वरित= लगेच	

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५३

निघाला विप्र त्वरित। पोहत गेला प्रवाहांत।
पैलतटा जाऊनि त्वरित। देखता जाहला श्रीगुरूसी ॥ ५३ ॥

गद्यरुप :-

ब्राह्मण लगेच निघाला, प्रवाहातून पोहत जाऊन पलीकडच्या तीरावर पोहचला. श्रीगुरुंना त्याने समक्ष (प्रत्यक्ष) पाहिले.

शब्दार्थ :-

विप्र= ब्राह्मण	त्वरित= लगेच
पैल=पलीकडचा	तट= तीर
देखत= समक्ष	

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५४

चरणांवरी ठेवूनि माथा। करी स्तोत्र अत्यंता।
श्रीगुरुमूर्ति संतोषतां। आश्वासिती तया वेळीं॥५४॥

गद्यरुप :-

श्रीगुरुंच्या पायावर डोके ठेवून, तो श्रीगुरुंची स्तुती करायला लागला.श्रीगुरुमूर्ति समाधानी झाल्यावर त्यावेळी त्यांनी त्याला धीर दिला.

शब्दार्थ :-

चरण= पाय	माथा = डोके
स्तोत्र= प्रशंसापर गद्य किंवा पद्यरचना	
आश्वासन =धैर्य देणारे भाषण	

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५५

संतोषोनि श्रीगुरुमूर्ति। माथा हस्त ठेविती।
ज्ञान जाहलें त्वरिती। जिव्हा आली तात्काळ॥५५॥

गद्यरुप :-

श्रीगुरुमूर्तिंनी समाधानी होऊन,त्याच्या (अल्प स्मरणशक्ती असलेल्या ब्राह्मण मुलाच्या) डोक्यावर हात ठेवला. (त्या ब्राह्मण मुलाला) लगेच ज्ञानप्राप्ती झाली. तात्काळ जीभ आली.

शब्दार्थ :-

संतोष= समाधान	माथा = डोके
जिव्हा= जीभ	

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५६

वेद-शास्त्र-पुराण। तर्क भाषा व्याकरण।
समस्त त्याचें अंतःकरण। पूर्ण जाहलें तात्काळीं॥५६॥

गद्यरुप :-

त्याला वेद –शास्त्र – पुराण, तर्क, भाषा, व्याकरण या सर्वांनी त्याचे अंतःकरण तात्काळ भरुन पावले.

शब्दार्थ :-

समस्त=सर्व	पूर्ण= भरलेले शेवटास गेलेले

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५७

जैसा मानससरोवरास। वायस जातां परियेस।
जैसा होय राजहंस। तैसें झालें विप्रकुमरा॥५७॥

गद्यरुप :-

जसा मानससरोवरास, कावळा जाताच त्याचा राजहंस होतो, असे आपण ऐकतो. तसे ब्राह्मणकुमाराच्या बाबतीत घडले.

शब्दार्थ :-

वायस= राजहंस	परियसणे= ऐकणे

भावार्थ :-अल्प स्मरणशक्तीमुळे मूर्ख ठरल्या गेलेल्या, ब्राह्मणकुमाराचे ज्ञानसंपन्न विद्वानात रुपांतर झाले. ब्राह्मणकुमारामध्ये ज्ञानप्राप्तीमुळे आमुलाग्र बदल झाला.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५८

चिंतामणि-संपर्केसीं। सुवर्ण होय लोह कैसी।
मृत्तिका पडतां जांबूनदीसी। सुवर्ण होय जेवीं देखा॥५८॥

गद्यरुप :-

चिंतामणिच्या संपर्कात लोखंडाचे सोन्यात रुपांतर कसे होत असेल ? जांबूनदीत माती पडताच, ज्याप्रमाणे तिचे सोने होते; असे आपण पहातो.

शब्दार्थ :-

चिंतामणि= इच्छिलेले देणारा मणि (काल्पनिक मणि), गणपती		
सुवर्ण= तेजस्वी	लोह= लोखंड	कैसा =कसा?
मृत्तिका=माती	जेवी= ज्याप्रमाणे	

'जांबूनदी' शब्दाच्या अर्थासाठी जिज्ञासुंनी शब्दार्थ चर्चा हे सदर पहावे.

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ५९

तैसें तया ब्राह्मणासी। गुरुचरण होतां स्पर्शी।
आला अखिल विद्या त्यासी। वेदशास्त्रादि तर्क भाषा॥५९॥

गद्यरुप :-

श्रीगुरुचरणाचा स्पर्श होताच, त्या ब्राह्मणाचे तसे झाले (त्या ब्राह्मणाला तशाचप्रकारचा अनुभव आला - त्याला ज्ञानप्राप्तीची जाणीव झाली), त्याला सर्व विद्या वेदशास्त्र तर्कभाषा इत्यादि ज्ञानप्राप्ती झाली.

शब्दार्थ :-

तैसे= तशाचप्रकारे	चरण= पाय	अखिल= सर्व

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ६०

सिद्ध म्हणे नामधारका। श्रीगुरुमहिमा ऐसी ऐका।
जे जे स्थानीं वास देखा। स्थानमहिमा ऐसी असे॥ ६० ॥

गद्यरुप :-

सिद्धमुनि नामधारक (शिष्यास) म्हणाले, “असा श्रीगुरुमहिमा आहे, तो ऐक. ज्या ज्या ठिकाणी त्याचा (श्रीगुरुंचा) वास राहील त्या ठिकाणास स्थानमहिमा प्राप्त होईल.”

शब्दार्थ :-

स्थान= ठिकाण	वास= वास्तव्य

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी क्रमांक ६१

म्हणोनि सरस्वती-गंगाधर। सांगे श्रीगुरुचरित्रविस्तार।
ऐकतां होय मनोहर। सकळाभीष्ट साधती॥ ६१ ॥

गद्यरुप :-

म्हणून सरस्वती गंगाधर श्री गुरुचरित्र विस्ताराने सांगतात. तो (श्रीगुरुचरित्रविस्तार) ऐकताना मनोहर असून सगळ्यांचे कल्याण साधणारा आहे.

शब्दार्थ :-

सकळाभीष्ट= सकळ (सगळे) + अभीष्ट (कल्याण)

॥ श्रीगुरुचरित्र ॥ अध्याय सतरावा

भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ओवी संख्या ६१

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ

श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने।

सिद्ध-नामधारकसंवादे

भिल्लवडीस्थानमहिमावर्णनं- मंदमतिब्राह्मणवरप्रदानं

नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥ ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

गद्यरुप :-

अशाप्रकारे श्रीगुरुचरित्र अमृतातून, कल्पतरुप्रमाणे परमकथा असणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपआख्यानातून, सिद्ध(मुनी) व नामधारक यांच्या संवादातून, भिल्लवडीस्थानमहिमावर्णन- मंदमतिब्राह्मणवरप्रदान नावाचा सतरावा अध्याय श्रीगुरुदेवदत्तात्रेयाला अर्पण असो.

शब्दार्थ :-

सप्तदश =सप्तः (७) + दश (१०) = सतरा (१७)

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥